# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 05/08/2023 (शनिवार) सकाळ

---

## नागपूर ग्रामीण जिल्हयाची अवैध जुगार धंदयाविरूद्ध विशेष मोहीम

पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांनी दिनांक ०१/०७/२०२३ ते दिनांक ३१/०७/२०२३ पर्यंत यशस्वी जुगार मोहीम पार पाडली. नागपूर ग्रामीण जिल्हयाचे पोलीस अधीक्षक यांनी नागपूर ग्रामीण जिल्हयातील सर्व ठाणेदार यांना अवैध जुगारावर आळा बसविण्याकरीता विशेष मोहीमेचे आयोजन केले होते. या विशेष मोहीमे दरम्यान नागपूर ग्रामीण जिल्हयातील पोलीस स्टेशन अंतर्गत एकुण २४१ जुगार कायदयान्वये गुन्हे नोंद करून एकुण ३९९ आरोपीतांविरूद्ध कारवाई करण्यात आली. त्यांच्याकडुन नगदी ७,५०,४८९/—रू., २९ विविध कंपन्याचे मोबाईल, २७ दुचाकी वाहने, ०२ चारचाकी वाहने व इतर साहित्य असा एकुण २७,९९,४७३/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदरच्या मोहीमेमुळे नागपूर ग्रामीण जिल्हयात अवैध जुगार खेळणाऱ्यांचे धाबे दणाणले असुन पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण विशाल आनंद यांनी अशाच प्रकारे अवैध धंदयावर वेगवेगळया प्रकारचे मोहीम राबवुन अवैध धंदयाचे समुळ नष्ट करण्याची घोषणा केली आहे.

## पोलीस स्टेशन कुही हद्दीत जुगार अड्ड्यावर कुही पोलीसांची धडक कारवाई
## एकुण ३०,७६,२००/— रुपयांचा मुद्देमाल केला हस्तगत.

पोस्टे. कुही हद्दीतील मौजा सालई गोधनी शिवारात जुगार सुरू असल्याबाबत गुप्त बातमीदारांकडून मिळालेल्या खात्रीशिर माहीती वरुन दिनांक ०५/०८/२०२३ रोजी पोलीस स्टेशन कुही येथील पोलीसांच्या पथकाने सदर जुगार अड्डयाची योजनाबध्द पद्धतीने आखणी करूण सदर जुगार अड्ड्यावर धाड टाकुण सदर जुगार अड्डुयावर ३३ जुगार खेळणारे आरोपीतांची पंचासमक्ष अंगझडती घेतली असता त्यांच्या अंगझडतीमधुन २,१३,०००/—रू. नगदी तसेच डावावर लावलेले ६८,०००/—रू. नगदी असे एकुण २,८१,०००/—रु नगदी तसेच घटनास्थळावर जुगार क्लब प्रमाणे सुविधा पुरवीण्याकरीता गॅस सिलेंडर, खुर्ची, गंज, मिक्सर, बॅटरी लाईट या प्रकारचे सामान तसेच दोन चारचाकी वाहन व १४ दुचाकी वाहने तसेच आरोपीतांकडील मोबाईल फोन असा एकुण ३०,७६,२००/—रूपयाचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. सदर घटनास्थळाची पाहणी केली असता यातील आरोपी पैकी आरोपी क्र १) नामे सोहन मेश्राम वय ३५ वर्ष, रा. विठ्ठलवाडी हुडकेश्वर रोड नागपुर हा जुगार खेळणाऱ्या लोकांना जागा उपलब्ध करूण देतो व जुगार खेळणाऱ्या लोकांच्या जेवणापासुन सर्व सुवीधा जागेवर पुरवीत असल्याचे घटनास्थळाच्या पाहणी वरूण दिसुन येत होते. पोलीसांना आपल्या जुगार खेळण्याचा जागेचा पता लागु नये तसेच पोलीस कार्यवाही करण्याकरीता येत असल्यास आधिच सुचना

देण्याकरीता आरोपींनी घटनास्थळाकडे जाणाऱ्या सर्व मार्गावर पहरेदार (वॉचर) ठेवले असतांना सुध्दा पोलीसांनी मोठ्या शिताफीने पहरेदाराच्या नजरेत न येता चार शेत पायदळ चालुन सदरची कामगिरी केली.

सदरची कार्यवाही ही पोलीस अधिक्षक विशाल आनंद (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधिक्षक डॉ. संदिप पखाले यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी ठाणेदार IPS अनिल म्हस्के, पोलीस स्टेशन कुही परि. पोलीस उपअधिक्षक तथा प्रभारी ठाणेदार भिवापुर राहुल झलाटे, पोलीस उपनिरीक्षक देवीदास ठमके, पोलीस नायक हरीदास चाचरकर, रोशन नारनवरे, ग्यानीवंत गुरपुडे, पोलीस शिपाई दुर्गेश डहाके, अनिल करडखेले, आशिष खंडाईत, उमेश ठवकर, रविद्र मारबदे, पंकज सावरे, तुषार भोयर पियुष वाढीवे यांनी यशस्वीपणे पूर्ण केलेली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर